लोकमत पु.पा.१.

## महिलेचा विनयभंग



**मीरा रोड :** मीरा रोडच्या काशीगाव पोलिस ठाणे हद्दीत राहणाऱ्या एका महिलेचा ३१ वर्षीय व्यक्तीने विनयभंग केल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. सुधीर त्रिवेदी नामक व्यक्ती एका महिलेला माझ्याशी फ्रेंडशिप कर म्हणून सतत मेसेज करून तसेच ती प्रत्यक्ष दिसल्यास तिला सांगत असे. अखेर त्याच्या जाचाला कंटाळून महिलेने काशीगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर १३ एप्रिल रोजी पोलिसांनी त्याच्याविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिक तपास करत आहेत.

## बॉल दुचाकीला लागल्याने मारहाण

**नालासोपारा :** मनवेल पाड्यातील नॅशनल शाळेच्या खुल्या मैदानात काही मुले रविवारी सकाळी क्रिकेट खेळत होती. त्यातील एका मुलाने बॅटने मारलेला बॉल ईश्वर याच्या दुचाकीच्या टायरला लागला. याच रागातून त्याने मुलाला धक्काबुक्की करून शिवीगाळ करीत त्याच्या हातातील दुचाकीच्या चावीने मुलाच्या कपाळावर मारून दुखापत केली. ईश्वरने त्याच्या मित्राला बोलावून घेतल्यावर त्याने मुलाला लाकडी बांबूने हातापायावर मारहाण केली. या प्रकरणी विरार पोलिसांनी ईश्वर आणि त्याच्या मित्राविरोधात गुन्हा दाखल केला आहे.


# मीरा-भाईंदर शहरात शुक्रवारी पाणीबाणी

### एमआयडीसीचा पुरवठा २४ तास राहणार बंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहराला होणारा एमआयडीसीचा पाणीपुरवठा शुक्रवारी २४ तासांसाठी दुरुस्तीच्या कामामुळे बंद राहणार आहे.

मीरा-भाईंदरला स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा करण्यात येतो. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणीपुरवठा योजनेच्या अंतर्गत बारवी गुरुत्व वाहिनीचे कटाई नाका ते शीळ टाकी येथे तातडीची देखभाल व दुरुस्तीची कामे करण्याकरिता २४ तासांचा शटडाऊन घेतला जाणार आहे. त्यामुळे गुरुवारी (दि.१८) रात्री १२ वा. ते शुक्रवारी (दि.१९) रात्री १२ वाजेपर्यंत २४ तासांसाठी एमआयडीसी प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे. या दरम्यान स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा सुरू राहणार आहे.



### 'पाणी जपून वापरा'

एमआयडीसी प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा पूर्ववत होईपर्यंत मीरा-भाईंदर शहरास पाणीपुरवठा कमी दाबाने व उशिराने होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता शरद नानेगावकर यांनी केले आहे. तर २४ तास पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने नागरिकांना दोन ते तीन दिवस पाणीटंचाई सहन करावी लागणार आहे.

# महापालिकेच्या बसने चिरडला महिलेचा पाय

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसई सुरुची बागनजीक अस्मिता चौक येथे एका दुचाकीचालक महिलेच्या पायावरून वसई-विरार महापालिकेची बस गेल्याने अपघाताची घटना घडली.

सोमवारी संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडली. या चौकात संध्याकाळी भाजी विक्रेते जमा होतात. त्यामुळे भाजी घेण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होते. काही ठिकाणी टेम्पो दुचाकीसारखी वाहने रस्त्यात पार्क करतात. परिणामी वाहतुकीसाठी मोठा अडथळा निर्माण होतो.

ही अपघातग्रस्त महिला दुचाकीवरून भाजी घेत असताना, महापालिकेची बस भास्कर आळी बाजूस जात होती. यावेळी बसच्या मागच्या चाकाखाली या महिलेचा पाय येऊन दुखापत झाली. नागरिकांनी आरडाओरड करीत बसचालकास बस मागे घेण्यास सांगितले. त्यानंतर या महिलेचा पाय चाकाखालून काढण्यात आल्याची माहिती उपस्थितांनी दिली.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण



**नालासोपारा :** विरारच्या कोपरी येथील परिसरात राहणाऱ्या सोळा वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची घटना घडली आहे. घरच्यांनी आजूबाजूला शोध घेतला; पण ती सापडली नाही. कोणी तरी तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन तिला कशाचे तरी आमिष दाखवून शनिवारी पळवून नेल्याची तक्रार तिच्या वडिलांनी रविवारी विरार पोलिस ठाण्यात देऊन गुन्हा दाखल केला आहे.

## पत्नीचा छळ; पतीविरुद्ध गुन्हा

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या गोल्डन नेस्ट भागात राहणाऱ्या अमी अमित मिश्रा या महिलेच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी तिचा पती अमित मिश्रा (४६) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अमित हा नेहमी मारहाण, शिविगाळ व दमदाटी करून मानसिक, शारीरिक व आर्थिक छळ करत असल्याची फिर्याद तिने दिली. नवघर पोलिस अधिक तपास करत आहेत.

CamScanner

लोकसत्ता पा.नं.३.

# झोपेचा अधिकार ही मूलभूत मानवी गरज

## उच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती; रात्रभर जबाब नोंदवल्यावरून ईडीला फटकारले

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** झोपेचा अधिकार ही मूलभूत मानवी गरज असून त्याचे उल्लंघन केले जाऊ शकत नाही, असा निर्वाळा देताना आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणा एका ज्येष्ठ नागरिकाची रात्रभर चौकशी केल्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाला (ईडी) फटकारले. तसेच, चौकशीच्या वेळांबाबत तपास यंत्रणांना आवश्यक ते आदेश देणे गरजेचे असल्याचेही अधोरेखीत केले.

आरोपीचा जबाब दिवसात कधीही नोंदवण्यात यावा. तो रात्रीच्या वेळेत नोंदवला गेल्यास त्याच्या शरीरावर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो, असेही न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. राम इस्रानी (६४) या आरोपीने आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणात ईडीने केलेल्या अटकेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्याच्या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी खंडपीठाने झोपेच्या अधिकाराबाबत उपरोक्त निर्वाळा दिला.

समन्सनंतर चौकशीसाठी उपस्थित राहून आणि तपासात हरप्रकारे सहकार्य करूनही अटक करण्यात आल्याचा दावा याचिकाकर्त्याने केला होता. तसेच, अटक बेकायदा ठरवण्याची मागणी केली होती. आपण ७ ऑगस्ट २०२३ रोजी ईडी अधिकाऱ्यांसमोर उपस्थित झालो, त्यावेळी, पहाटे साडेतीन वाजेपर्यंत आपली चौकशी केल्याचेही याचिकाकर्त्याने याचिकेत म्हटले होते. न्यायमूर्ती डेरे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने याचिकाकर्त्याची याचिका फेटाळली. मात्र, रात्रभर चौकशी करण्याच्या प्रथेबाबत नाराजी व्यक्त केली. याचिकाकर्त्याने रात्रभर जबाब नोंदवण्यास संमती दिली होती, असा दावा ईडीच्या वतीने वकील हितेन वेणेगावकर यांनी युक्तिवादाच्या वेळी केला. तथापि, याचिकाकर्त्याने त्याची उशिरापर्यंत चौकशी करण्यास परवानगी दिली होती हा मुद्दा गौण असल्याचे नमूद करून रात्रभर चौकशी करण्यास किंवा जबाब नोंदवण्याची प्रथा मान्य करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

याचिकाकर्ता चौकशीसाठी अधिकाऱ्यांसमोर उपस्थित झाला होता. त्यामुळे, त्याची रात्रभर चौकशी करण्याऐवजी तपास अधिकारी त्याला दुसऱ्या दिवशी चौकशीसाठी बोलवू शकले असते. त्यामुळे, आरोपीच्या परवानगीने रात्रभर चौकशी केल्याचे म्हणणे निराधार आहे. विचित्र वेळेत आरोपीचा जबाब नोंदवण्याने त्याच्या झोपेवर परिणाम होतो. म्हणूनच रात्रभर चौकशी करण्याला मान्यता दिली जाऊ शकत नसल्याचा पुनरुच्चार न्यायालयाने केला.

### मानवी हक्कांचे उल्लंघन

**झोपेचा अधिकार ही मूलभूत मानवी गरज असून ती पूर्ण करु न देणे संबंधित व्यक्तीच्या मानवी हक्कांचे उल्लंघन आहे, असे निरीक्षणही न्यायालयाने ईडीच्या चौकशीच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढताना नोंदवले. झोपेच्या कमतरतेमुळे एखाद्या व्यक्तीच्या आरोग्यावर परिणाम होतो आणि त्याची मानसिक क्षमता, अन्य शारीरिक यंत्रणा बिघडू शकते, असेही न्यायालयाने नमूद केले. तसेच, आरोपीला चौकशीला बोलावल्यानंतर तपास यंत्रणा त्याची वाजवी वेळेच्या पलीकडे चौकशी करुन त्याला झोपेच्या मूलभूत मानवी गरजेपासून वंचित ठेवणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.**

CamScanner

लोकसत्ता ५.४.१९२३.



# वसई किल्ला परिसरात बिबट्या अद्याप मोकाट

## संध्याकाळनंतर रो-रो सेवा बंदची मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसईच्या किल्ला परिसरातील बिबटा मागील १५ दिवसांपासून मोकाट असल्याने त्याच्या भीतीने या भागातील नागरिकांचे जीवन विस्कळीत झाले आहे. शनिवारी प्रांत अधिकाऱ्यांच्या बैठकीत स्थानिकांनी याबाबत संताप व्यक्त केला. दरम्यान, बिबट्यामुळे संध्याकाळी ६ नंतर रो-रो बोटीच्या सेवा बंद करण्याची मागणी पुरातत्व खाते तसेच वनविभागाने महाराष्ट्र सागरी मंडळाकडे नागरिकांनी केली आहे.

२९ मार्च रोजी वसईच्या ऐतिहासिक किल्ल्यात बिबट्या आढळला होता. तेव्हापासून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शनिवारी वसईच्या उपविभागीय कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी वनविभागाकडून बिबट्याला पकडण्यासाठी हव्या त्या प्रमाणात प्रयत्न केले जात नसल्याचा आरोप कोळी युवा शक्ती संघटनेचे मिल्टन सौदीया यांनी केला. बिबट्यामुळे याभागातील नागरिकांची ये-जा करण्याची वहिवाट कायमची बंद करण्याचा हा डाव तर नाही ना असा प्रश्न संजय कोळी यांनी उपस्थित केला. लोकांचा जीव जाण्याची वनखाते वाट बघत आहे का ?असा सवाल कुलदीप वर्तक यांनी केलो . बिबटया सारखा हिस्त्र जनावर वसईत किल्यात फिरत असून वनाधिकारी वसईत का फिरकले नाहीत, असा सवाल वसई काँग्रेसचे वसई विधानसभा अध्यक्ष कुलदीप वर्तक यांनी केला. कोणत्याही प्रकारची ठोस उत्तरे वनविभागाकडून ग्रामस्थांना दिली जात. याबाबत यावेळी संताप व्यक्त करण्यात आला. या **(पान ३ वर)**




# वसई किल्ला परिसरात बिबट्या अद्याप मोकाट


***(पान १ वरून)*** बैठकीत प्रांताधिकारी शेखर घाडगे, तहसीलदार डॉ. अविनाश कोष्टी, वनविभागाच्या मांडवी वनपरिक्षेत्र अधिकारी श्वेता आडे, पुरातत्व विभागाचे कैलास शिंदे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक रणजित आंधळे, रोरो सेवा कर्मचारी, किल्लाबंदर-पाचूबंदर येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

**बिबट्या पकडण्यासाठी व्यापक मोहीम घ्या - प्रांताधिकारी**

बिबट्याच्या वावरामुळे असंख्य अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत. त्याला जेरबंद करण्यासाठी वनविभागाने आपले प्रयत्न वाढवेत अशा सूचना वसईचे उपविभागीय अधिकारी शेखर घाडगे यांनी केल्या आहेत. आमच्या स्तरावरून जी काही मदत लागेल ती देण्यास ही आम्ही तयार आहोत असेही घाडगे यांनी सांगितले. हा बिबट्या तुंगारेश्वर जंगलातून या भागात आला आहे. त्याला पकडण्यासाठी ट्रॅप कॅमेरे, आवश्यक ठिकाणी पिंजरे लावले आहेत. परंतु बिबट्या बाहेर येण्याच्या वेळेत सातत्याने मानवी वर्दळ, रो-रो सेवा यामुळें पकडण्यात अडचणी येत असल्याचे मांडवी वनपरीक्षेत्र अधिकारी श्वेता आडे यांनी सांगितले आहे.

सामना पा.नं.४

# चिमुकलीवर अत्याचार; जमावाची तोडफोड

## भाईंदरमध्ये २५ जणांवर गुन्हा दाखल

भाईंदर, दि. १५ (सा.वा.) – चार वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधमाला नवघर पोलिसांनी अटक केली. इम्रान खान असे या विकृतीचे नाव असून त्याचा चिकनचा व्यवसाय आहे. याप्रकरणी पोलिसांनी त्याच्याविरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. नराधम इम्रानला अटक केल्यानंतर पोलीस ठाण्यात जमलेल्या संतप्त जमावाने परिसरात तोडफोड केली. याप्रकरणी नवघर पोलिसांनी सुमारे २५ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.



नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारी चार वर्षीय चिमुकली खेळताना शेजारी असलेल्या चिकनच्या दुकानात गेली. त्यावेळी इम्रान खान या नराधमाने तिच्यावर अत्याचार केल्याची तक्रार चिमुकलीच्या वडिलांनी केली. या तक्रारीवरून पोलिसांनी इम्रानला अटक केली. मात्र ही घटना उघडकीस आल्यानंतर संतप्त जमावाने पोलीस ठाण्यात ठिय्या मांडला. यावेळी जमावाने पोलीस ठाण्यात जोरदार घोषणाबाजी देण्यास सुरुवात केली. जमाव पांगवण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला.

### दुकाने, हातगाड्यांचे नुकसान

आक्रमक झालेल्या जमावाने आसपासच्या परिसरात तोडफोड केली. या तोडफोडीत पोलीस ठाण्याशेजारी असलेली दुकाने व हातगाड्यांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी नवघर पोलिसांनी शांततेचा भंग करून कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्या जमावातील २० ते २५ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

लोकसत्ता पु.पा.१.

# दोघांच्या मृत्यूप्रकरणी घरमालकावर गुन्हा

**भाईंदर:** घराचा स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी घरमालक असलेल्या डॉक्टरविरोधात नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

रविवारी भाईंदर पूर्व येथील नवघर मधील श्रीनाथ ज्योती नामक इमारतीच्या तळमजल्यावर खोलीच्या अंतर्गत दुरुस्तीचे काम करत असताना स्लॅब कोसळला होता. या दुर्घटनेत कंत्राटदार हरीनाम चौहान आणि कामगार संजय यादव यांचा मृत्यू झाला होता. या घटनेतील खोलीमालक डॉ. विनयकुमार त्रिपाठी याने शेजारी-शेजारी असलेल्या दोन खोल्याना एकत्र करण्यासाठी इमारतीमधील महत्वाच्या बांधकामाचे तोडकाम केले होते. यामुळे ही घटना घडली. असे अंतर्गत बदल करण्यापूर्वी घरमालकाने कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे बेकायदा बांधकाम करून दोन जणांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याने तसेच इतर सोसायटी मधील इतर रहिवाशांचा जीव धोक्यात टाकल्याप्रकरणी विनयकुमार त्रिपाठीविरुद्ध नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सकाळ पा.नं.६.

# भाईंदरमधील तोडफोडप्रकरणी गुन्हा दाखल

भाईंदर, ता. १५ (बातमीदार) : पूर्व भागात राहणाऱ्या चार वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर जमावाने दुकानांची तोडफोड केली होती. याप्रकरणी पोलिसांनी २५ ते ३० अज्ञात व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे.

एका चिकन शॉप चालकाने शेजारीच राहणाऱ्या चार वर्षीय मुलीवर अत्याचार केले होते. ही बाब उघडकीस आल्यानंतर जमावाने तीन



ते चार दुकानांची तोडफोड केली होती. जमावाने नवघर पोलिस ठाण्याबाहेर जमून घोषणाबाजीदेखील केली. त्यामुळे वातावरणात तणाव निर्माण झाला होता. आरोपीला अटक करण्यात आली असल्याचे सांगूनही जमाव ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. परिस्थिती हाताबाहेर जाऊन नये यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीमार करून जमावाला पांगवले. त्यानंतर तोडफोड केल्याप्रकरणी पोलिसांनी २५ ते ३० जणांवर गुन्हा दाखल केला आहे. सीसी टीव्हीच्या मदतीने या सर्व आरोपींची ओळख पटविण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिली.

CamScanner

सकाळ ५.५.१.

# डम्पिंग ग्राऊंडबाबतची आश्वासने कागदावरच!

## मिरा-भाईंदर पालिकेच्या उपाययोजनांवर नागरिकांची नाराजी कायम

भाईंदर, ता. १५ (बातमीदार) : उत्तन येथील डम्पिंग ग्राऊंडबाबत नागरिकांना पालिका प्रशासनाकडून पुन्हा एक नवीन आश्वासन मिळाले आहे. उत्तन येथे जाणारा कचरा टप्प्याटप्प्याने कमी होईल, यासाठी प्रशासनाकडून नियोजन करण्यात आले आहे, अशी हमी आयुक्तांनी ग्रामस्थांना दिली आहे, मात्र हे आश्वासन पाळले जाणार का, याआधी वेळोवेळी दिलेल्या आश्वासनांप्रमाणेच हेही कागदावरच राहणार, असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे.

डम्पिंग ग्राऊंडसंदर्भात ग्रामस्थ आक्रमक झाल्यांनातर गेल्या आठवड्यात आयुक्तांनी नागरिकांसोबत बैठक घेतली होती, मात्र त्या बैठकीत कोणताही ठोस निर्णय झाला नव्हता. त्यामुळे आठ दिवसांनी पुन्हा बैठक घेण्याचे नक्की करण्यात आले होते. त्यानुसार सोमवारी (ता. १५) ही बैठक झाली. उत्तनमध्ये कचऱ्याच्या गाड्या नकोच, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली. डम्पिंग ग्राऊंडची समस्या सोडविण्यात प्रशासन सपशेल अयशस्वी ठरले असून महापालिकेचा सर्व निधी कंत्राटदाराचे हित साध्य करण्यासाठी वापरला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. या बैठकीला आमदार गीता जैन, माजी आमदार गिल्बर्ट मेन्डोन्सा, फादर ऑस्कर मेन्डोन्सा, मच्छीमार नेते लिओ कोलासो, बर्नड डिमेलो, जॉर्जी गोविंद, शर्मिला गंडोली आदी मान्यवर उपस्थित होते.



### गृहप्रकल्पामध्ये प्रक्रिया

दीडशेहून अधिक घरे असलेल्या संकुलात कचऱ्यावर प्रक्रिया होते की नाही, याची पडताळणी केली जाईल. या सर्व उपाययोजनांमुळे उत्तनमधील डम्पिंग समस्या बऱ्याच अंशी कमी होईल, असे आश्वासन आयुक्त संजय काटकर यांनी दिले.

### कोकोपीट तयार करणार

उत्तनला जाणारा कचरा एकदम बंद करणे शक्य होणार नाही, मात्र डम्पिंग ग्राऊंडवर जाणारा कचरा टप्प्याटप्प्याने कमी होईल, याचे नियोजन प्रशासनाकडून सुरू आहे. त्यानुसार शहरात दररोज निर्माण होणारा शहाळी, नारळ आदी ६० टन कचरा स्वतंत्रपणे गोळा केला जाणार असून त्यापासून कोकोपीट तयार केले जाईल.

### कचरा स्वतंत्रपणे गोळा करत विल्हेवाट

औद्योगिक कारखान्यातून तयार होणारा बफिंगचा कचरा स्वतंत्र गोळा करून त्याची शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट लावली जाईल. शहरातील सुमारे ३८२ हॉटेल व ७१ मिठाईची दुकाने यातून निर्माण होणारा ७० टन कचरा, चिकनपासून तयार होणारा सुमारे ४० टन कचरा स्वतंत्रपणे गोळा करून त्याची शहरातच विल्हेवाट लावण्यात येईल.

### प्रकल्पाची क्षमता वाढवणार

सध्या डम्पिंग ग्राऊंडवर असलेल्या कचरा प्रक्रिया प्रकल्पाची क्षमता तीनशे टनापर्यंत वाढवली जाईल. यापद्धतीने दररोज गोळा होणाऱ्या साडेचारशे टनापैकी साडेतीनशे टन कचरा डम्पिंग ग्राऊंडवर जाणार नाही, याचे नियोजन प्रशासनाकडून करण्यात आले आहे व त्याची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी केली जाईल.

### नागरिकांच्या मागण्या

शहरात गोळा होणार कचरा आता उत्तनमध्ये न नेता त्याच्यावर शहरातच प्रक्रिया करण्यात यावी, कचरा टाकण्यासाठी शहरातील अन्य जागांची निवड करावी, कचरा प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी महापालिकेने याआधी आश्वासन दिलेले दहा प्रकल्प तातडीने सुरू करावेत, आदी मागण्या ग्रामस्थांनी केल्या.

> आतापर्यंत येणाऱ्या प्रत्येक आयुक्तांनी डम्पिंग समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. वेगवेगळ्या उपाययोजनांची माहिती दिली, मात्र प्रत्यक्षात काहीच घडलेले नाही. त्यामुळे या वेळी तरी त्याची अंमलबजावणी होईल की नाही, याची ग्रामस्थांना शाश्वती नाही.
>
> **- लिओ कोलासो**, मच्छीमार नेते, उत्तन

लोकमत ५-५-२०

# नायगाव परिसराला फेरीवाल्यांचा विळखा

## घाणीच्या साम्राज्यामुळे नागरिक त्रस्त

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : नायगाव पूर्व विभागाला सध्या फेरीवाल्यांचा मोठ्या प्रमाणात विळखा पडला आहे. त्यामुळे ये-जा करणारे पादचारी, वाहने यांना तेथील अनधिकृत फेरीवाले व रस्त्यालगतच्या अनधिकृत पानटपऱ्यांमुळे अडथळा निर्माण होत आहे. महापालिका प्रशासन व स्थानिक पोलिसही फेरीवाल्यांच्या वाढत्या उपद्रवाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

नायगाव पूर्व परिसर तसेच येथील लहान - मोठ्या खाडीपुलांवर फेरीवाले बस्तान मांडून आहेत.

### वाहतूककोंडीतही भर

येथून वाहने ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत आहे. तसेच वाहनांचा खोळंबा वाढून वाहतूककोंडीचा सामना करावा लागत आहे. पादचाऱ्यांना चालण्यासाठी येथे रस्ता शिल्लक राहात नसल्याने त्यांना मनःस्तापाला सामोरे जावे लागत आहे. फेरीवाले त्यांच्याकडील वस्तू विकून झाल्या की, कचरा तेथेच टाकतात. हा कचरा कुजून तेथे घाणीचे साम्राज्य पसरते. त्यामुळे नागरिकांनी याविरोधात संताप व्यक्त केला आहे

CS CamScanner

लोकमत पु.पा.१.

# वसईत २८९ वाहनांची तपासणी; ६५ टँकर फिटनेसमध्ये अपयशी

## टँकरचालकांच्या बेदरकारपणामुळे घडतात अपघात

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई-विरार शहरांत अनेक भागांतील नागरिकांची तहान टँकरद्वारे भागविली जात आहे. मात्र वसईकरांची तहान भागविणाऱ्या काही टँकरला आरटीओचे फिटनेस प्रमाणपत्र नसून ते बिनधास्तपणे रस्त्यावर धावत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. दुसरीकडे १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च या कालावधीत २८९ टँकरची तपासणी करण्यात आली. यात ६५ दोषी टँकर सापडले असून त्यांना दंड करण्यात आला आहे.

शहरात सर्रास भंगार व विनाक्रमांक धोकादायक टँकरच्या माध्यमातून वाहतूक सुरू आहे. राजरोसपणे सुरू असलेल्या या टँकरच्या निमित्ताने फिटसनेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरात सध्या एक-दोन दिवसांआड कमी दाबाने पाणी येत आहे. सध्या भीषण उन्हाळा जाणवत असल्याने पाणीटंचाईच्या झळा सुरू झाल्या आहेत. अनेक वसाहतींना नळयोजनाच नसल्याने त्यांना पाण्याच्या टँकरवर तहान भागवावी लागत आहे. पाण्याची मागणी वाढल्याने सध्या शहरात टँकरचा व्यवसाय जोरात सुरू आहे.

अनेक टँकरचालक अचानकपणे वेगात वळण घेतात. त्यामुळे अन्य वाहनांना आणि पादचाऱ्यांना धोका निर्माण करीत असल्याचे चित्र आहे. टँकरला क्रमांक, रिफ्लेक्टर, ब्रेक लॅम्प, स्टॉपगार्ड बसवणे आवश्यक आहे. मात्र यातील एकाही बाबीची पूर्तता केली जात नसल्याचे दिसून येत आहे.



वसई-विरारमध्ये अनेक भागांत हजारो अनधिकृत पाण्याचे टँकर बिनधास्तपणे सुरू आहेत. गेल्या पाच वर्षांत या टँकरने चिरडून रस्ते अपघातात शेकडो जणांचा बळी घेतला असून शेकडो जखमी झाले आहेत. वसई-विरार परिसरातील पाण्याची टंचाई पाहता बहुतांश रहिवासी व सोसायट्यांना या अनधिकृत टँकरने पाणीपुरवठा केला जातो.

या टँकरचालकांमध्ये स्पर्धा सुरू आहे. काही टँकरचालक दारूच्या नशेत असतात. ते चालक टँकरची गती वाढवून अधिक कमाईच्या शोधात अनेक लोकांना चिरडतात. येत्या काही दिवसांत टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू, रस्ता ओलांडताना महिला व बालकाचा मृत्यू अशा अनेक अपघातांना हे अनधिकृत टँकरचालक जबाबदार आहेत. मरण पावलेल्या व्यक्तीमुळे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले आहे, तर बरेच जण जखमी झाले आहेत.

**वसई-विरार शहर महापालिकेच्या स्थापनेपासूनच या परिसरात टँकरचे मोठे जाळे विणलेले आहे. या परिसरात टँकरमाफियांचे प्रस्थ असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे दरवर्षी या शहरात पाणीटंचाई जाणवत असते. आता सूर्या प्रकल्पाचे पाणी शहराला देण्यात आलेले आहे. मात्र अद्याप अनेक ठिकाणी हे पाणीच पोहोचलेले नाही. त्यामागेही टँकर लॉबीचे अर्थकारण असल्याची चर्चा वसई, नालासोपारा, विरार परिसरात सतत होत असते. अनेक इमारतींना अद्यापही टँकरच्या पाण्यावाचून गत्यंतर नाही, अशीच स्थिती आहे. ही स्थिती कधी बदलणार? असा सवाल येथील नागरिक करीत आहेत.**

१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च या कालावधीत २८९ टँकरची तपासणी केली आहे. यात ६५ दोषी टँकर सापडले असून ७ लाख २३ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

**- प्रवीण बागडे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, विरार**

CamScanner